जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

28 OCT 2026
सकाळ



विद्यार्थिनींच्या आठ वसतिगृहांचे रूप पालटले

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांचे पाऊल

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : एखाद्या अधिकाऱ्याने सकारात्मक दृष्टिकोन ठेवून एखादी गोष्ट मनावर घेतली, तर प्रशासकीय व्यवस्थेतही विद्यार्थ्यांच्या हिताचे बदल घडवून आणता येतात. याचे उदाहरण शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी मुलींच्या वसतिगृहांत केलेल्या बदलांतून दाखवून दिले. विद्यार्थिनींचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य, निवासातील सोयीसुविधा आणि दैनंदिन अडचणी यांना प्राधान्य देत त्यांनी विद्यापीठातील आठ मुलींच्या वसतिगृहांचे रूप पालटले आहे.



शिवाजी विद्यापीठ : विद्यार्थिनींचे मते, सूचना, अडचणी जाणून घेत त्यांच्याशी संवाद साधून प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी वसतिगृहांमध्ये सुधारणा केल्या आहेत.

विद्यार्थिनींसह महिला प्राध्यापक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशीही संवाद वाढविला. त्यामुळे त्यांना अडचणी, सूचना, अपेक्षा मनमोकळेपणाने मांडण्यासाठी व्यासपीठ मिळाले. या संवादातून आपुलकीचे नाते निर्माण झाले आहे. त्याचा सकारात्मक परिणाम जाणवतो. या प्रक्रियेतून मिळणारे समाधान वेगळे आहे.
-डॉ. ज्योती जाधव, प्र-कुलगुरू

विद्यापीठात शिक्षणासाठी विविध भागांतून विद्यार्थिनी येतात. त्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरणात राहता यावे, अभ्यासासाठी पोषक सुविधा मिळाव्यात, दैनंदिन गरजांच्या पूर्ततेसाठी अडचणी येऊ नयेत, या उद्देशाने वसतिगृहांत विविध सुधारणा केल्या. त्यातून विद्यार्थिनींच्या निवासाचा दर्जा उंचावण्यासह त्यांच्या भावनिक आणि मानसिक स्वास्थ्याची काळजी घेण्यावर भर दिला आहे.

मेसमधील जेवणाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यावरही लक्ष केंद्रित केले. केवळ प्रशासकीय पातळीवर सूचना देऊन न थांबता डॉ. जाधव यांनी अनेकदा अचानकपणे मेसला भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यार्थिनींसमवेत जेवण करून संवाद साधला. जेवणाचा दर्जा, त्याची चव, उपलब्ध पदार्थ आणि भोजन व्यवस्थेबाबत विद्यार्थिनींची मते जाणून घेतली. त्यांनी केलेल्या सूचना आणि मांडलेल्या अडचणींचा विचार करून आवश्यक बदल केले.

खोल्यांपासून वाचनकक्षापर्यंत बदल

मुलींच्या आठ वसतिगृहांतील खोल्या, स्वच्छतागृहे, कॉरिडॉर, वाचनकक्ष आणि प्रतीक्षागृह यांचे स्वरूप बदलले आहे. या ठिकाणी आवश्यक सुविधां उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. वसतिगृहातील वातावरण अधिक स्वच्छ, सुटसुटीत आणि विद्यार्थिनींच्या दैनंदिन गरजांना पूरक बनविण्याचा प्रयत्न केला.

स्पोर्टस् हॉस्टेलमधून बसची व्यवस्था

विद्यार्थिनींची संख्या अधिक असल्याने उपलब्ध जागेचा योग्य वापर करून त्यांना आरामदायी पद्धतीने राहता यावे, यासाठी स्पोर्टस् हॉस्टेलमध्येही त्यांच्या निवासाची व्यवस्था केली. येथे जेवणाची सुविधा देण्यासह स्वतंत्र वाचनकक्ष केला आहे. स्पोर्टस् हॉस्टेलमध्ये राहणाऱ्या विद्यार्थिनींना विद्यापीठाच्या अधिविभागांत वेळेत पोहोचता यावे, यासाठी बसची सुविधाही देण्यात आली.

28 OCT 2026
पुढारी

महात्मा फुलेंची राष्ट्रकल्पना लोकशाहीवादी : डॉ. मोरे

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्रास प्रारंभ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

महात्मा जोतिराव फुले यांची राष्ट्रकल्पना लोकशाहीवादी होती. ब्रिटिशांच्या प्रचलित राज्यकल्पनेपेक्षा वेगळी राष्ट्रनिर्मितीची संकल्पना त्यांनी मांडली. 'एकमय समाज आणि एकमय राष्ट्र' ही संकल्पना फुलेंनी मांडल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे प्रा. डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्ययन केंद्र, आंतरभारती शिक्षण मंडळ, गांधी अभ्यास केंद्र आणि कॉ. दत्ता देशमुख अध्यासन यांच्या सहकार्याने आयोजित 'महात्मा फुलेंचे राष्ट्रउभारणीतील योगदान' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या बीजभाषणात ते बोलत होते.

डॉ. मोरे म्हणाले, महात्मा फुले यांनी इंग्लंडमधील उमरावशाहीवर



डॉ. सदानंद मोरे

टीका केली होती. हंटर आयोगाच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित केले होते. फुले ब्रिटिश नोकरशाहीच्या विरोधात होते. समाजातील जातिभेद नष्ट करूनच समताधिष्ठित राष्ट्राची उभारणी शक्य असल्याचा त्यांचा विश्वास होता.

डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी फुलेंना बहुजन आणि वंचितांचे स्वराज्य निर्माण करायचे होते, असे सांगितले.


कुलगुरू डॉ. आर. के. कामत म्हणाले, फुलेंनी अथक प्रयत्नांतून स्त्रीशिक्षणाची ज्योत पेटवली. सर्वसामान्यांना शिक्षण मिळाल्यास राष्ट्राची उभारणी होईल, ही त्यांची धारणा आजही प्रेरणादायी आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 OCT 2026 जनप्रवास

महात्मा फुलेंची राष्ट्रकल्पना लोकशाहीवादी : डॉ. सदानंद मोरे

जनप्रवास : कोल्हापूर

महात्मा जोतिराव फुले यांची राष्ट्रकल्पना लोकशाहीवादी होती. ब्रिटिशांच्या प्रचलित राज्यकल्पनेपेक्षा वेगळी राष्ट्रनिर्मितीची संकल्पना त्यांनी मांडली. एकमय समाज, एकमय राष्ट्र या संकल्पना महात्मा फुलेंनी मांडल्या, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे प्रा. डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्ययन केंद्र, आंतरभारती शिक्षण मंडळ, गांधी अभ्यास केंद्र आणि कॉम्रेड दत्ता देशमुख अध्यासन यांच्या सहकार्याने आयोजित 'महात्मा फुलेंचे राष्ट्रउभारणीतील योगदान' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या बीजभाषणात ते बोलत होते. डॉ. मोरे म्हणाले, महात्मा फुले यांनी इंग्लंडमधील उमरावशाहीवर टीका केली होती. हंटर आयोगाच्या भूमिकेवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. फुले ब्रिटिश नोकरशाहीच्या विरोधात होते. त्यांची भूमिका लोकसत्तावादी होती. समाजातील जातिभेद नष्ट करूनच समताधिष्ठित राष्ट्राची उभारणी करता येईल, असा विश्वास त्यांना होता. त्यामुळे फुले यांच्या राष्ट्रकल्पनेचा विचार करताना त्यांच्या सामाजिक समता आणि लोकसत्तावादी दृष्टिकोनाचा विचार करणे आवश्यक आहे.

डॉ. सुनीलकुमार लवटे म्हणाले, महात्मा फुले यांना बहुजन आणि वंचितांचे स्वराज्य निर्माण करायचे होते. प्रस्थापित व्यवस्थेतील विषमता आणि अन्यायाविरोधात त्यांनी विविध वैचारिक प्रवाहांच्या माध्यमातून आवाज उठवला. त्यांच्या विचारांमधून वंचित घटकांच्या हक्कांचा आणि सामाजिक परिवर्तनाचा व्यापक दृष्टिकोन समोर येतो. कुलगुरू राजनीश कामत म्हणाले, महात्मा फुले यांचे शिक्षण विषयक कार्य थोर आहे. स्त्री शिक्षणाची ज्योत त्यांनी अथक प्रयत्नांनी पेटवली. सर्व सामान्यांना शिक्षण मिळाले तर राष्ट्र उभारणी होईल, अशी धारणा फुलेंची होती. त्यांचे हे कार्य आपल्याला प्रेरणा देणारे आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

28 OCT 2026
सकाळ

महात्मा फुलेंची राष्ट्रकल्पना लोकशाहीवादी

डॉ. सदानंद मोरे : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : महात्मा जोतिराव फुले यांची राष्ट्रकल्पना लोकशाहीवादी होती. ब्रिटिशांच्या प्रचलित राज्यकल्पनेपेक्षा वेगळी राष्ट्रनिर्मितीची संकल्पना त्यांनी मांडली. एकमय समाज, एकमय राष्ट्र या संकल्पना महात्मा फुले यांनी मांडल्या, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभाग, प्रा. डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्ययन केंद्र, आंतरभारती शिक्षण मंडळ, गांधी अभ्यास केंद्र आणि कॉम्रेड दत्ता देशमुख अध्यासनातर्फे झालेल्या 'महात्मा फुले यांचे राष्ट्रउभारणीतील योगदान' या विषयावरील दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या बीजभाषणात ते बोलत होते. डॉ. मोरे म्हणाले, 'महात्मा फुले यांनी इंग्लंडमधील उमरावशाहीवर टीका केली होती. हंटर आयोगाच्या भूमिकेवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. समाजातील जातिभेद नष्ट करूनच समताधिष्ठित राष्ट्राची उभारणी करता येईल, असा विश्वास त्यांना होता. त्यामुळे फुले यांच्या राष्ट्रकल्पनेचा विचार करताना त्यांच्या सामाजिक समता आणि लोकसत्तावादी दृष्टिकोनाचा विचार करणे आवश्यक आहे.'



शिवाजी विद्यापीठ : 'महात्मा फुले यांचे राष्ट्रउभारणीतील योगदान' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे. यावेळी शेजारी डॉ. प्रकाश पवार, श्रीराम पवार, पल्लवी कोरगावकर, रणधीर शिंदे उपस्थित होते.

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे म्हणाले, 'महात्मा फुले यांना बहुजन आणि वंचितांचे स्वराज्य निर्माण करायचे होते. प्रस्थापित व्यवस्थेतील विषमता आणि अन्यायाविरोधात त्यांनी विविध वैचारिक प्रवाहांच्या माध्यमातून आवाज उठवला. त्यांच्या विचारांमधून वंचित घटकांच्या हक्कांचा आणि सामाजिक परिवर्तनाचा व्यापक दृष्टिकोन समोर येतो.'

कुलगुरू डॉ. आर. के. कामत म्हणाले, 'महात्मा फुले यांचे शिक्षण विषयक कार्य थोर आहे. स्त्री शिक्षणाची ज्योत त्यांनी अथक प्रयत्नांनी पेटवली. सर्व सामान्यांना शिक्षण मिळाले, तर राष्ट्र उभारणी होईल, अशी धारणा त्यांची होती.' कॉ. दत्ता देशमुख अध्ययन केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार, ज्येष्ठ पत्रकार डॉ. श्रीराम पवार, पल्लवी कोरगावकर, डॉ. रणधीर शिंदे आदी उपस्थित होते.

28 OCT 2026
लोकमत

महात्मा फुले यांची राष्ट्रकल्पना लोकशाहीवादी होती : मोरे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महात्मा जोतिराव फुले यांची राष्ट्रकल्पना लोकशाहीवादी होती. ब्रिटिशांच्या प्रचलित राज्यकल्पनेपेक्षा वेगळी 'एकमय समाज, एकमय राष्ट्र' ही संकल्पना त्यांनी मांडली, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र विभाग, प्रा. डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्ययन केंद्र, आंतरभारती शिक्षण मंडळ, गांधी अभ्यास केंद्र आणि दत्ता देशमुख अध्यासन यांच्यातर्फे मंगळवारी 'महात्मा फुलेंचे राष्ट्रउभारणीतील योगदान' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या बीजभाषण प्रसंगी ते बोलत होते. मोरे म्हणाले, महात्मा फुले हे ब्रिटिश नोकरशाहीच्या विरोधात आणि लोकसत्तावादी होते. समाजातील जातिभेद पूर्णपणे नष्ट करूनच समताधिष्ठित राष्ट्राची उभारणी करता येईल. डॉ. सुनीलकुमार लवटे म्हणाले, महात्मा फुले यांनी प्रस्थापित व्यवस्थेतील विषमता आणि अन्यायाविरुद्ध सातत्याने आवाज उठवला. कुलगुरू डॉ. राजनीश कामत म्हणाले, महात्मा फुलेंचे शिक्षणविषयक आणि स्त्री-शिक्षणाचे कार्य थोर व प्रेरणादायी आहे.

28 OCT 2026
पुढारी

समकालीन प्रश्नांच्या संदर्भात महात्मा फुलेंचे विचार उपयुक्त

- ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अभय टिळक यांचे प्रतिपादन
- शिवाजी विद्यापीठात व्याख्यान



कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

सार्वजनिक कल्याणकारी राज्यव्यवस्थेत शासनाने कररूपाने जमा केलेल्या निधीचा विनियोग वंचित घटकांच्या कल्याणासाठी करावा, अशी महात्मा जोतिराव फुले यांची भूमिका होती. सिंचन, शेती आणि शिक्षणासारख्या प्रश्नांबाबत त्यांचे विचार आजही मार्गदर्शक असून, समकालीन प्रश्नांच्या संदर्भात महात्मा फुलेंचे विचार उपयुक्त आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अभय टिळक यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित महात्मा फुले स्मृती व्याख्यानमालेत 'महात्मा फुले, सार्वजनिक कल्याण आणि शासनव्यवस्था' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रा. डॉ. नंदकुमार मोरे होते.

डॉ. टिळक म्हणाले, शासनाने कररूपाने जमा केलेल्या निधीचा योग्य विनियोग करून समाजातील वंचित घटकांच्या गरजांना प्राधान्य दिले पाहिजे. साधनसंपत्तीचे न्याय्य वाटप आणि सार्वजनिक कल्याणाच्या दृष्टीने शासनाची भूमिका महत्त्वाची आहे. समाजातील पहिल्या पिढीतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाने विशेष बळ द्यावे. उच्चशिक्षणाच्या माध्यमातून वंचित घटकांना संधी उपलब्ध करून देण्यासाठी सकारात्मक हस्तक्षेप आवश्यक आहे. तसेच, कल्याणकारी धोरणांची अंमलबजावणी करताना नोकरशाहीनेही वंचितांच्या हिताला प्राधान्य द्यावे.

महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्याचा विचार केवळ ऐतिहासिक संदर्भात न करता, आजच्या सार्वजनिक धोरणांच्या आणि शासनव्यवस्थेच्या अनुषंगाने करणे आवश्यक आहे. त्यांच्या विचारांचा समकालीन प्रश्नांशी संबंध जोडल्यास सामाजिक न्याय आणि कल्याणकारी राज्याची संकल्पना अधिक व्यापकपणे समजून घेता येईल, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी साहित्यिक राजन गवस, डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील आणि पल्लवी कोरगावकर उपस्थित होते.

28 OCT 2026

जनप्रवास

महात्मा फुलेंचा विचार उपयुक्त

अर्थतज्ज्ञ डॉ. अभय टिळक यांचे प्रतिपादन

जनप्रवास : कोल्हापूर

सार्वजनिक कल्याणकारी राज्यव्यवस्था असावी, शासनाने कररूपाने जमा केलेल्या निधीचा विनियोग वंचित घटकांच्या कल्याणासाठी करावा, अशी महात्मा जोतिराव फुले यांची भूमिका होती. सिंचन, शेती आणि शिक्षणासारख्या प्रश्नांबाबत फुले यांचे विचार आजही प्रस्तुत असून, समकालीन प्रश्नांच्या संदर्भात महात्मा फुलेंचा विचार उपयुक्त आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अभय टिळक यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित महात्मा फुले स्मृती व्याख्यानमालेत 'महात्मा फुले, सार्वजनिक कल्याण आणि शासनव्यवस्था' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रा. डॉ. नंदकुमार मोरे होते.

डॉ. टिळक म्हणाले, शासनाने जमा केलेल्या कराचा योग्य विनियोग करून समाजातील वंचित घटकांच्या गरजांना प्राधान्य दिले पाहिजे. साधनसंपत्तीचे न्याय्य वाटप आणि सार्वजनिक कल्याणाच्या दृष्टीने शासनाची भूमिका महत्त्वाची आहे. शेती, सिंचन आणि शिक्षण या क्षेत्रातील प्रश्नांचा विचार करताना महात्मा फुले यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता लक्षात घेणे आवश्यक आहे. नोकरशाहीनेही शासनाच्या कल्याणकारी धोरणांची अंमलबजावणी करताना वंचितांच्या हिताला प्राधान्य द्यावे, असे फुले यांच्या विचारांतून स्पष्ट होते. महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्याचा विचार केवळ ऐतिहासिक संदर्भात न करता, आजच्या सार्वजनिक धोरणांच्या आणि शासन व्यवस्थेच्या संदर्भातही केला पाहिजे. त्यांच्या विचारांचा समकालीन प्रश्नांशी संबंध जोडून अभ्यास केल्यास सामाजिक न्याय आणि कल्याणकारी राज्याच्या संकल्पना व्यापकपणे समजून घेता येतील, असेही डॉ. टिळक यांनी नमूद केले. यावेळी राजन गवस, अवनिश पाटील, प्रकाश पवार, भारती पाटील, पल्लवी कोरगावकर उपस्थित होत्या.

28 OCT 2026

सकाळ

समकालीन प्रश्नांबाबत महात्मा फुलेंचा विचार उपयुक्त

डॉ. अभय टिळक : राज्यशास्त्र अधिविभागातर्फे व्याख्यान

कोल्हापूर, ता. २७ : शासनाने कररूपाने जमा केलेल्या निधीचा विनियोग वंचित घटकांच्या कल्याणासाठी करावा, अशी महात्मा जोतिराव फुले यांची भूमिका होती. सिंचन, शेती आणि शिक्षणासारख्या प्रश्नांबाबत फुले यांचे विचार आजही प्रस्तुत आहे. समकालीन प्रश्नांच्या संदर्भात महात्मा फुले यांचा विचार उपयुक्त आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अभय टिळक यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे झालेल्या महात्मा फुले स्मृती व्याख्यानमालेत 'महात्मा फुले, सार्वजनिक कल्याण आणि शासनव्यवस्था' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी अधिविभागाचे प्रा. डॉ. नंदकुमार मोरे होते.

डॉ. टिळक म्हणाले, 'शासनाने जमा केलेल्या कराचा योग्य विनियोग करून समाजातील वंचित घटकांच्या गरजांना प्राधान्य दिले पाहिजे.



डॉ. अभय टिळक

साधनसंपत्तीचे न्याय्य वाटप आणि सार्वजनिक कल्याणाच्या दृष्टीने शासनाची भूमिका महत्त्वाची आहे. महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्याचा विचार केवळ ऐतिहासिक संदर्भात न करता आजच्या सार्वजनिक धोरणांच्या आणि शासनव्यवस्थेच्या संदर्भातही केला पाहिजे.'

ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस, डॉ. प्रकाश पवार, भारती पाटील, पल्लवी कोरगावकर अवनिश पाटील उपस्थित होते.

28 OCT 2026

लोकमत

'समकालीन प्रश्नांच्या संदर्भात फुलेंचा विचार उपयुक्त' : टिळक

कोल्हापूर : सार्वजनिक कल्याणकारी राज्यव्यवस्था आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी कराचा योग्य विनियोग यावर महात्मा जोतिराव फुले यांचा भर होता. सिंचन, शेती आणि शिक्षणासारख्या समकालीन प्रश्नांवर महात्मा फुले यांचे विचार आजही तितकेच उपयुक्त आणि मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अभय टिळक यांनी केले.शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागातर्फे आयोजित 'महात्मा फुले, सार्वजनिक कल्याण आणि शासनव्यवस्था' या विषयावरील स्मृती व्याख्यानात ते बोलत होते. प्रा. डॉ. नंदकुमार मोरे अध्यक्षस्थानी होते.



28 OCT 202

जनप्रवास

विद्यापीठात महर्षी वाल्मिकी जयंती साजरी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महर्षी वाल्मिकी जयंती साजरी करण्यात आली. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, डॉ. सोनल चोंदे, डॉ. स्मिता पोरे, संभाजी परीट, कृष्णात पोवार यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

28 OCT 2026
सकाळ

कै. उदय कुलकर्णी यांच्या पत्रकारितेवर शुक्रवारी व्याख्यान

कोल्हापूर : येथील ज्येष्ठ पत्रकार स्वर्गीय उदय कुलकर्णी यांच्या पत्रकारितेचा वेध घेण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात शुक्रवारी (ता. ३०) सकाळी ११ वाजता ज्येष्ठ संपादक वासुदेव कुलकर्णी यांचे विशेष व्याख्यान होणार आहे. स्वर्गीय कुलकर्णी यांनी चार दशकांहून अधिक काळ पत्रकारितेत योगदान दिले. विविध सामाजिक प्रश्नांवर अभ्यासपूर्ण आणि संवेदनशील पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी ठसा उमटविला. त्यांच्या पत्रकारितेचा प्रवास, त्यांचे लेखन आणि पत्रकारितेतील योगदान यांची माहिती विद्यार्थ्यांना, नव्या पिढीतील पत्रकारांना व्हावी, या उद्देशाने या व्याख्यान आयोजित केले आहे. विद्यार्थी, पत्रकारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

28 OCT 2026
जनपथाल

आविष्कार संशोधन स्पर्धेत विवेकानंद कॉलेजचे सुयश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आयोजित आविष्कार संशोधन स्पर्धेत विवेकानंद कॉलेजच्या छवी यादव या विद्यार्थिनीचा ॲग्रीकल्चर या विभागातून तृतीय क्रमांक व विद्यापीठ स्तरीय आंतरजिल्हा स्पर्धेत चौथा क्रमांक आला. तसेच पदव्युतर विभागात ईश्वरी पोळ या विद्यार्थिनीचा तृतीय क्रमांक आला. या स्पर्धा अनुक्रमे कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेशनल व्होकेशन कोर्सेस फॉर वुमेन व शिवाजी विद्यापीठ येथे पार पडल्या. या संशोधन प्रकल्पासाठी डॉ. अस्मिता तपासे, डॉ. सलमा मुल्ला, प्रा. श्रीहरी कुलकर्णी, प्रा. आशुतोष उपाध्ये, प्रा. अमेय पाटील, प्रा. सचिन कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल अभयकुमार साळुंखे, कौस्तुभ गावडे, डॉ. मिलिंद हुजरे, डॉ. सी. बी. पाटील, डॉ. बी. टी. दांगट यांनी अभिनंदन केले.

28 OCT 2026

लोकमत

आरपीई परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२६ हिवाळी सत्रातील पीएच.डी. कोर्सवर्क व रिसर्च अँड पब्लिकेशन एथिक्स (आरपीई) परीक्षांचे अर्ज भरण्याचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

विद्यार्थ्यांना २८ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबरपर्यंत विनाविलंब शुल्कासह अर्ज भरता येणार आहेत. ३ नोव्हेंबरला विलंब शुल्कासह, तर ४ नोव्हेंबरला अतिविलंब शुल्कासह अर्ज भरता येतील. महाविद्यालये व विभागांनी शुल्काची रक्कम ३ ते ५ नोव्हेंबरदरम्यान जमा करायची असून, परीक्षा अर्जांच्या याद्या विद्यापीठात जमा करण्याची अंतिम तारीख ६ नोव्हेंबर आहे. विद्यार्थ्यांनी निर्धारित मुदतीत अर्ज भरावेत.